# महाराष्ट्र शासन

क्रमांक :- बैठक १११५/प्र.क्र.३७६/फ-१

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
ई-मेल- osdf१wl@gmail.com
दिनांक : ११ डिसेंबर, २०१५.

प्रति,

मुख्य वन्यजीव रक्षक
तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

विषय :- मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ४/१२/२०१५ रोजी झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या १० व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ४.१२.२०१५ रोजी झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या १० व्या बैठकीचे मराठी इतिवृत्त सहपत्रित करीत आहोत. बैठकीच्या इतिवृत्ताचा इंग्रजी अनुवाद करुन सर्व संबंधितांना मराठी व इंग्रजी इतिवृत्त पाठविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी, ही विनंती.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

(signature) ११/१२/१५

( अरविंद आपटे )
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

परिशिष्ट - १

**महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची १० वी बैठक, दिनांक ०४ डिसेंबर २०१५**

## कार्यवृत्तांत

महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची १० वी बैठक शुक्रवार दिनांक ०४ डिसेंबर २०१५ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, नामदार श्री. देवेन्द्र फडणवीस यांचे अध्यक्षतेखाली सहयाद्री अतिथी गृह, मलबार हिल, मुंबई येथे सकाळी १०.०० वाजता संपन्न झाली. बैठकीतील इतर उपस्थितांची नांवे सोबतच्या यादीत दिलेली आहेत. **(परिशिष्ट-१).**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य नागपूर तथा सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष तथा मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. उपाध्यक्ष तथा मा. मंत्री (वने) यांचे स्वागत करून सभेची पार्श्वभूमि व सभेत ठेवण्यांत आलेल्या विषयांबाबत प्रास्ताविक केले. त्यानंतर बैठकीत विषयसूची प्रमाणे मुद्येनिहाय चर्चा झाली. बैठकीत देण्यांत आलेली माहिती, झालेली चर्चा व मंडळाने घेतलेले निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

**विषय क्रमांक १ : दिनांक २२ जुन २०१५ रोजी मुंबई येथे झालेल्या ९ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत कायम करणे.**

दिनांक २२ जुन २०१५ रोजीचे कार्यवृत्तांत सर्व सभासदांना पाठविण्यांत आलेले असून त्यावर कोणत्याही सभासदांकडून अभिप्राय / आक्षेप प्राप्त झालेले नाहीत असे सदस्य सचिव तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी मंडळाचे निदर्शनास आणून दिले. सदर सभेच्या कार्यवृत्तांतास मान्यता प्रदान करण्यांत आली.

**विषय क्रमांक २ : महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक २२ जुन २०१५ रोजी झालेल्या ९ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांवर केलेली कार्यवाही.**

याबाबतची माहिती मंडळासमोर ठेवण्यांत आली व दिनांक २२ जुन २०१५ रोजीच्या बैठकीत घेण्यांत आलेल्या निर्णयांची माहिती ९ व्या बैठकीच्या विषय सूची समवेत परिशिष्ट-२ म्हणून जोडण्यांत आली असल्याचे निदर्शनास आणून दिले त्यास मंडळाने मान्यता प्रदान केली व कार्यवाही न झालेल्या मुद्यांवर शासनाने तात्काळ कार्यवाही पूर्ण करावी असे निर्देश दिलेत.

**विषय क्रमांक ३ : राष्ट्रीय उद्यान / अभयारण्यांचे सिमेबाहेर १०.०० कि.मी. अंतरापर्यंतच्या परिसरात विकासात्मक कामांबाबतचे प्रस्ताव**

| अ.क्र. | मुद्दा | झालेली चर्चा | घेतलेले निर्णय |
|---|---|---|---|
| ३.१ | **मुंबई पारबंदर प्रकल्प (MTHL) या प्रकल्पाकरीता उपशमन योजनांबाबत बीएनएचएसने तयार केलेला अहवाल** | राज्य वन्यजीव मंडळाच्या ९ व्या बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे प्रस्तावाची शिफारस मंडळाने केलेली होती. तसेच BNHS यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर BNHS व आवश्यकतेनुसार तज्ञांच्या मदतीने अभ्यास करून उपशमन योजना (Mitigation Measures) सुचवाव्यात या अटीवर मान्यता देण्याचे मंडळासमोर विदित केले होते. त्यानुसार BNHS द्वारे सदर क्षेत्राचा अभ्यास करून उपशमन योजना (Mitigation Measures) बाबत अहवाल प्राप्त झालेला आहे. अहवालामध्ये शिफारस केल्याप्रमाणे प्रस्तावित प्रकल्पाचे रेखांकन (Alignment) मध्ये बदल करून नंतरच उपशमन योजना अंमलात आणणेबाबत आग्रह धरलेला आहे. रेखांकन बदलल्याशिवाय कोणतीही उपशमन योजना केल्यास प्रभावी उपाययोजना ठरणार नाही. श्रीयुत मदान, अध्यक्ष मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांनी सादरीकरणाच्या माध्यमातुन मंडळासमोर सर्व बाबींचा उहापोह केला | **बीएनएचएसने प्रस्तावित केल्याप्रमाणे मूळ रेखांकनात बदल करणे तांत्रिक व भौगोलिक कारणास्तव शक्य नसल्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांनी सांगितले. तसेच BNHS यांनी सुचविल्याप्रमाणे दोन पिल्लर मधील अंतर वाढविणे तांत्रिक व वित्तीय दृष्टया शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या व्यतिरीक्त मड फ्लॅट / मॅन्ग्रोव्ह क्षेत्रातील बांधकाम १५ ते १८ महिन्यात पूर्ण करणे शक्य नसल्याचे सांगून जेटी बांधकामासाठी २४ ते ३० महिने व मधल्या स्पॅन बांधकामासाठी जास्तीचे १२ महिने लागतील असे नमूद केले. वन्यजीव संस्थान, डेहराडून यांचे प्रतिनिधी डॉ. झाला यांनी देखील पक्ष्यांच्या अधिवासाबाबत भाष्य करतांना असे निदर्शनास आणून दिले की अमेरिकेसारख्या देशामध्ये अशाच प्रकारच्या प्रकरणात बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पक्षी पुन्हा त्याच अधिवासात परत आले असल्याचे असे दिसून आले. त्यामुळे सध्याच्या** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | रेखांकनामध्ये (alignment) काही बदल करण्याची आवश्यकता नसल्याचे मत त्यांनी प्रदर्शित केले.<br>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ह्यांनी केलेले सादरीकरण आणि त्यावरील चर्चा विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.<br>१) MMRDA मार्फत प्रस्तावित केलेल्या मूळ रेखांकनास (alignment) मान्यता देण्यात येत आहे.<br>२) BNHS द्वारे दि. २३/०९/२०१५ रोजी सादर केलेल्या अहवालाप्रमाणे मूळ रेखांकनासाठी सर्व उपशमन योजना (mitigation measures) खालील बदलांसह मान्य करण्यात आल्या:-<br>i) मड फ्लॅट / मॅन्ग्रोव्ह मधून होणा-या बांधकामाच्या दोन्ही टोकाकडील जेटीचे बांधकाम ३० महिन्यांच्यावर व मधल्या स्पॅनचे बांधकाम १२ महिन्यांच्यावर जाता कामा नये.<br>ii) MMRDA द्वारे सद्यस्थितीत प्रस्तावित |